**नि.फौ.ख.क्र.२३/२०२०**
**सरकार वि. ज्ञानेश्वर चौपडे**
**निशाणी ३२**

**<u>अभियोगपक्षातर्फे साक्षीदार क्र.२ यांची साक्ष</u>**

मी याद्वारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो की,

**माझे नाव** :– अनिल उत्तम शिंदे
**वय** :– ४० वर्षे, **धंदा** :– शेती,
**राहणार** :– चिंचाळे, ता. आटपाडी, जि. सांगली.

**<u>सरतपासणी अभियोगपक्षातर्फे – श्रीमती ए.पी.केसकर, विद्यमान सहा. सरकारी वकील यांचेमार्फत</u>**

**०१.** दि. ०५/११/२०१९ रोजी पोलीसांनी मला पंचनाम्यासाठी बोलाविले नव्हते. माझ्यासमक्ष पोलीसांनी कोणतीही कारवाई केली नाही. आता मला घटनास्थळ पंचनामा आणि नकाशा दाखविण्यात आला. त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकुर मला माहिती नाही. मी आरोपीला ओळखतो. मी त्यांचेकडे कामाला आहे.

**<u>सदर साक्षीदार अभियोगपक्षास पुराव्याकामी सहकार्य करीत नसल्यामुळे विद्यमान सहा. सरकारी वकील यांना तोंडी विनंती वरुन साक्षीदारास उत्तरसुचक प्रश्न विचारण्याची परवानगी देण्यात आली</u>**

**०२.** हे म्हणणे खरे नाही की, दि. ०५/११/२०१९ रोजी मी आरोपी यांच्या शेतजमीनीमध्ये पंचनामा करण्यासाठी गेलो होतो, त्याठिकाणी पोलीसांनी माझे समक्ष एक काटी जप्त केली, त्यानंतर पोलीसांनी माझ्यासमक्ष घटनास्थळाचा पंचनामा व नकाशा तयार केला व तो मी वाचून सही केली. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी यांचेकडे मी काम करीत असलेमुळे त्यांना वाचविण्यसाठी मी आज खोटी साक्ष देत आहे.

**<u>उलटतपास आरोपीतर्फे – श्री.व्ही.पी.देशमुख विद्यमान वकील यांच्यामार्फत सुरु</u>**

**नाकारला.**

**फेरतपास काही नाही.**

श्रवणोत्तर स्विकृती,
समक्ष,

RAHUL BHALCHANDRA KULKARNI
Digitally signed by RAHUL BHALCHANDRA KULKARNI
Date: 2025.07.15 10:38:03 +0530

दि. १४/०७/२०२५
आटपाडी.

( आर. बी. कुलकर्णी )
सह न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग,